गुरूवार
२६
मार्च २०२६

वर्ष १९ वे
अंक - ७४
पाने - ०६
किंमत - ०४ रूपये


Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com

दैनिक
# युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता

संपादिका : सौ. सुशीला किसन हासे (बी. ए.)
संस्थापक : किसन भाऊ हासे (बी. जे.)
कार्यकारी संपादक : सुदीप किसन हासे (एम.ई.)

RNI No. MAHMAR/2007/24252
पोष्टाचा परवाना क्रमांक BII/RNP/SRP/25/2023-25

## श्रीराम नवमीच्या सर्व श्रीराम भाविक भक्तांना हार्दीक शुभेच्छा!




# डॉ. चत्तर हॉस्पिटल

## मॅटर्निटी होम

### स्त्री रोग, व्यंधत्व, प्रसुतिशास्त्र व दुर्बिणीद्वारे शस्त्रक्रिया

**नॉर्मल डिलीव्हरीसाठी प्राधान्य**



**डॉ. सुयोग भाऊसाहेब चत्तर**
(एम.बी.बी.एस., डी.जी.ओ.)
स्त्रीरोग व प्रसुतीशास्त्र तज्ज्ञ



**डॉ. पौर्णिमा सुयोग चत्तर**
(बी.ए.एम.एस.)
स्त्रीरोग चिकित्सक

**उपलब्ध सुविधा**

- व्यंधत्व निदान व उपचार
- प्रसुतिपूर्व व प्रसुतिपश्चात तपासणी
- कुटुंबनियोजन सल्ला व मार्गदर्शन
- वैद्यकीय गर्भपात केंद्र
- अद्ययावत ऑपरेशन थिएटर
- सर्व प्रकारच्या ऑपरेशन्सची सुविधा
- NDVH बिनटाका गर्भपिशवीचे ऑपरेशन
- लॅपरोस्कोपी (दुर्बिनीद्वारे उपचार)
- गर्भपिशवी आजार तपासणी व उपचार

वेळ - सकाळी १० ते ३
सायंकाळी ४ ते ६.३०, रविवार बंद

**२४ तास अत्यावश्यक सेवा**

**व्ही.बी.फार्मा**
होलसेल मेडिकल व सर्जिकल्स
श्रमिक मंगल कार्यालया शेजारी,
अकोले बायपास रोड, संगमनेर
ता. संगमनेर जि. अहिल्यानगर
मो. ९४२३२२५५९८
९९६०८८५७७८




सिध्दकला आयुर्वेद कॉलेजजवळ, शिबलापूर रोड,संगमनेर खु।। - ४२२६०५
मोबाईल - ८६००८३६०७६

पॅनल देणे आहे

सणांचा आनंद आणि बचतीची सुवर्णसंधी घेऊन येत आहे
ओम महाले अँड ग्रुप प्रस्तुत
पोपट भगीरथ महाले ज्वेलर्स!
PBM Jeweller's
अशोक चौक, चावडीजवळ, संगमनेर, जि. अ. नगर
१ तारखेपासून सुरू – फ्री GST स्कीम
होळीच्या शुभमुहूर्तावर सुरू होणारी ही खास ऑफर थेट रमजान ईदपर्यंत – संपूर्ण एक महिना!
- संपर्क - 7599996999 8265036807
लग्नकार्य, वाढदिवस किंवा खास गिफ्टसाठी हीच योग्य वेळ!
या कालावधीत सोनं, चांदी आणि आकर्षक दागिन्यांची खरेदी करा आणि मिळवा GST पूर्णपणे फ्री!
विश्वास, गुणवत्ता आणि शुद्धतेची खात्री पोपट भगीरथ महाले ज्वेलर्स!
मर्यादित कालावधीची ऑफर
आजच भेट द्या आणि बचतीचा सुवर्णयोग साधा!

पॅनल देणे आहे



नोकरीची सुवर्णसंधी
CONTACT : 98223 43319
सेल्समन .................. 05
सेल्सगर्ल.................. 05
कॉम्प्युटर ऑपरेटर.... 02
हेल्पर....................... 03
We are HIRING!
भंडारी
We are HIRING!
मेनरोड कॉर्नर, संगमनेर

# समनापूरमध्ये दारू परवाना वाद चिघळला

## महिलांचा टोकाचा इशारा, प्रशासनावर तीव्र ताशेरे

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेरपासून अवघ्या चार किलोमीटर अंतरावर असलेल्या समनापूर गावात सीएल-३ दारू विक्री परवान्याच्या वादाने तीव्र स्वरूप धारण केले असून ग्रामस्थांनी प्रशासनाविरोधात आक्रमक भूमिका घेतली आहे. महिलांनी तर आंदोलन तीव्र करण्याचा इशारा देत टोकाची भूमिका घेतल्याने परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले.

ग्रामस्थांच्या आरोपानुसार, गुंजाळवाडी येथील दारू विक्री परवाना समनापूर येथे स्थलांतरित करताना महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमातील अंतर नियम तसेच ग्रामपंचायत कायद्याचा भंग करण्यात आला आहे. ग्रामपंचायतीने संबंधित ठराव नामंजूर केला असतानाही परवाना मंजूर करण्यात आल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. या संदर्भात संगमनेर पंचायत समितीचे तत्कालीन गटविकास अधिकारी अनिलजी नागणे यांनी हा ठराव मंजूर करता येत नाही असे मत नोंदवले होते. मात्र त्यानंतरही निर्णयप्रक्रियेत सहभाग घेतल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला असून हा प्रकार महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ अंतर्गत नियमभंग असल्याचे त्यांनी म्हटले आहे. ग्रामसेवक सुनील नागरे यांच्या भूमिकेवरही प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले आहे. तसेच संपूर्ण प्रक्रियेत आर्थिक अनियमितता झाल्याचा संशय व्यक्त केला जात आहे.

समनापूर हे गाव प्रशासनाच्या नोंदीत संवेदनशील क्षेत्र म्हणून ओळखले जाते. यापूर्वी येथे जातीय दंगली, खून, दरोडे यांसारख्या गंभीर घटनांचा इतिहास आहे. अलीकडेच एका अल्पवयीन मुलीवर झालेला ॲसिड हल्ला प्रस्तावित दारू दुकानापासून अवघ्या दीड किलोमीटर अंतरावर घडल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. या पार्श्वभूमीवर ग्रामस्थांनी प्रशासनाला थेट प्रश्न विचारले आहेत की, अशा संवेदनशील भागात दारू विक्रीला परवानगी देणे कितपत योग्य आहे? तसेच दारू ही अत्यावश्यक वस्तू नसताना ग्रामसभेच्या मताला दुय्यम स्थान का देण्यात आले. दरम्यान, समनापूरमधील बहुसंख्य महिलांनी या निर्णयाविरोधात तीव्र आंदोलनाचा इशारा दिला असून आत्मदहनाचा इशारा देत प्रशासनाला लेखी निवेदन दिले आहे. ही निवेदने उपजिल्हाधिकारी, संगमनेर, संगमनेर शहर पोलीस, राज्य उत्पादन शुल्क विभाग तसेच तहसीलदार यांना सादर करण्यात आली आहेत. मात्र अद्याप ठोस कारवाई न झाल्याने महिलांमध्ये संताप वाढला आहे. या आंदोलनात वंदना शेरमाळे, संदीप दळवी, संदीप शेरमाळे, रावसाहेब शेरमाळे, संतोष शेरमाळे, यासर भागवत शेरमाळे, मनोज भास्कर, रियाज शेख आदी ग्रामस्थ सक्रिय सहभागी झाले आहेत. आमच्या सुरक्षिततेचा प्रश्न असताना प्रशासन आमच्या जीवाशी खेळत आहे का? असा संतप्त सवाल महिलांनी उपस्थित केला आहे. ग्रामस्थांनी दारू परवाना तात्काळ रद्द करण्याची, संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करण्याची आणि संबंधित अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

# आईच्या स्मृतीतून स्वप्नांना पंख, शंभर सायकलींचे वाटप

## कपिल पवार यांच्याकडून विद्यार्थ्यांच्या शिक्षणप्रवासाला नवी गती





युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर -ऊन, वारा, चिखल आणि खडतर वाटा तरीही डोळ्यांत स्वप्नं आणि मनात शिक्षणाची जिद्द! दररोज चार ते पाच किलोमीटर पायपीट करत शाळेचा रस्ता गाठणाऱ्या ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या आयुष्यात आज एक हळवा आणि प्रेरणादायी क्षण उजाडला.

आईच्या मायेची ऊब काय असते याची जाणीव करून देणारा एक अनोखा उपक्रम संगमनेरमध्ये पाहायला मिळाला. राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष कपिल पवार यांनी आपल्या आई स्वर्गीय कुसुमताई पवार यांच्या वर्षश्राद्धानिमित्त तब्बल १०० अत्याधुनिक सायकलींचे वाटप करत या विद्यार्थ्यांच्या शिक्षणप्रवासाला नवी गती दिली.

या सायकली केवळ प्रवासाचे साधन नाहीत, तर अनेक छोट्या-छोट्या स्वप्नांना पंख देणारी ताकद ठरल्या. सायकल हातात घेताच विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर उमटलेला आनंद, डोळ्यांत दाटलेले अश्रू आणि मनात दाटलेला आत्मविश्वास पाहून उपस्थितांनाही भावना अनावर झाल्या. संगमनेर आणि सिन्नर तालुक्यातील अनेक विद्यार्थी रोज खडतर परिस्थितीतून शाळेत पोहोचतात. कुणाला चिखलातून वाट काढावी लागते, कुणाला उन्हाची तीव्र झळ सहन करावी लागते, तर कुणाला कच्च्या रस्त्यांवरून जीव धोक्यात घालून चालावे लागते. पण या सगळ्या अडचणींवर मात करत शिक्षणाची आस त्यांनी कधीही सोडली नाही. हाच संघर्ष ओळखून कपिल पवार यांनी हा हृदयस्पर्शी निर्णय घेतला.

या उपक्रमाची आणखी एक विशेष बाब म्हणजे विद्यार्थ्यांची निवड अत्यंत पारदर्शक आणि संवेदनशील पद्धतीने करण्यात आली. ग्रामीण भागातील शिक्षकांशी संवाद साधून खरोखरच गरजू, आर्थिकदृष्ट्या दुर्बल आणि शिक्षणाची तीव्र ओढ असलेल्या विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. आता वेळ वाचेल थकवा कमी होईल आणि शाळेत आणखी उत्साहाने जाता येईल, अशा भावना विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर स्पष्ट उमटल्या. अनेकांसाठी ही सायकल म्हणजे त्यांच्या आयुष्यातील पहिलीच मोठी भेट होती. कार्यक्रमाला सायळे गावचे सरपंच विकास शेंडगे, बाळासाहेब गुंजाळ, सुभाष राहाणे, शरद हासे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. सर्वांनी या उपक्रमाचे मनापासून कौतुक करत विद्यार्थ्यांना उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

मोठ्या खर्चात वर्षश्राद्ध साजरे करण्याऐवजी समाजासाठी काहीतरी अर्थपूर्ण करण्याचा संदेश या उपक्रमातून देण्यात आला. त्यामुळे हा उपक्रम केवळ मदतीपुरता मर्यादित न राहता समाजासाठी प्रेरणादायी ठरत आहे. कपिल पवार यांनी यावेळी भावना व्यक्त करत सांगितले, आईच्या स्मृतीप्रित्यर्थ काहीतरी समाजोपयोगी करावे, अशी इच्छा होती. या मुलांचा संघर्ष पाहून त्यांना सायकली देण्याचा निर्णय घेतला. त्यांच्या स्वप्नांना गती मिळाली, हेच माझ्यासाठी सर्वात मोठे समाधान आहे.

आज या सायकलींनी केवळ अंतर कमी केले नाही, तर या मुलांच्या आयुष्यातील संघर्ष थोडा हलका केला आणि त्यांच्या स्वप्नांच्या वाटेला एक नवी दिशा दिली.

# वकिलांच्या सुरक्षेसाठी कायदा कधी होणार ? - आ. सत्यजीत तांबे



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - राज्यातील वकिलांवर होणाऱ्या वाढत्या हल्ल्यांच्या घटनांमुळे कायदा व सुव्यवस्थेबाबत गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. न्यायव्यवस्थेतील महत्त्वाचा घटक असलेल्या वकिलांच्या सुरक्षेचा मुद्दा ऐरणीवर आला असून या पार्श्वभूमीवर आमदार सत्यजीत तांबे यांनी सभागृहात ठोस भूमिका मांडत वकील संरक्षण कायदा लागू करण्याबाबत सरकारला जाब विचारला.

यावेळी बोलताना आ. तांबे म्हणाले की, वकिलांच्या सुरक्षेचा प्रश्न हा केवळ एका घटकापुरता मर्यादित नसून तो थेट न्यायप्रक्रियेच्या सुरक्षिततेशी आणि विश्वासार्हतेशी संबंधित आहे. न्यायासाठी लढणाऱ्यांवरच हल्ले होत असतील तर सामान्य नागरिकांना न्याय कसा मिळणार? असा सवाल ही यावेळी तांबे यांनी उपस्थित केला.राज्य सरकारकडून यापूर्वी दिलेल्या उत्तरात केंद्र सरकार या विषयावर कायदा तयार करत असल्याचे सांगण्यात आले होते. मात्र तांबे यांनी या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत स्पष्ट केले की, देशातील अनेक राज्यांनी वकिलांच्या सुरक्षेसाठी स्वतंत्र कायदे केले आहेत. इतर राज्ये पुढाकार घेत असताना महाराष्ट्राने केवळ केंद्राच्या निर्णयाची वाट पाहणे योग्य आहे का? असा प्रश्नही उपस्थित केला.

यावेळी प्रामुख्याने वकिलांवरील हल्ल्यांच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याचे निदर्शनास आणून देत तातडीने ठोस उपाययोजना करण्याची गरज आहे वकिलांना संरक्षण देणे ही केवळ कायदेशीर नव्हे, तर नैतिक जबाबदारी आहे, असेही तांबे यांनी स्पष्ट केले.

उत्तर देताना राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांनी सकारात्मक प्रतिसाद देत सांगितले की, राज्य सरकारकडून केंद्र सरकारशी सातत्याने पाठपुरावा सुरू आहे. केंद्र शासनाकडून वकील संरक्षणासंदर्भात स्वतंत्र कायदा करण्याची प्रक्रिया सुरू असून लवकरच याबाबत निर्णय अपेक्षित आहे असे त्यांनी स्पष्ट केले.

### आमदार तांबे यांचा पाठपुरावा

**१ मार्च २०२४ – अर्थसंकल्पीय अधिवेशनात मागणी मांडली, २१ डिसेंबर २०२४ – हिवाळी अधिवेशनात पुन्हा लक्ष वेधले, ७ जुलै २०२५ – पावसाळी अधिवेशनात मागणी कायम ठेवली, १५ जुलै २०२५ – पुणे बार असोसिएशनच्या वकिलांसह मा. मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस आणि विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्यासोबत चर्चा. दरम्यान तांबे यांनी सरकारला सूचित केले की केंद्राचा कायदा येईपर्यंत राज्याने स्वतःची स्पष्ट भूमिका घ्यावी आणि आवश्यक असल्यास स्वतंत्र कायदा करण्याचा विचार करावा. न्यायव्यवस्थेवर नागरिकांचा विश्वास टिकवून ठेवण्यासाठी वकिलांचे संरक्षण अत्यावश्यक असल्याचे सांगितले.**

# पंचायत समिती अधिकाऱ्यांचे काम बंद आंदोलन



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर पंचायत समिती मधील सी आर पी महिला बचत गटाचे समुदाय संसाधन अभियान व्यवस्थापकांना मारहाण झाल्याच्या निषेधार्थ पंचायत समितीच्या गटविकास अधिकाऱ्यां सह सर्वच विभागाच्या अधिकाऱ्यांनी कामबंद आंदोलन करत निषेध व्यक्त केला

संगमनेर पंचायत समितीतील सी आरपी विभागातील समुदाय संसाधन अभियान व्यवस्थापक नंदलाल पोपट कोकाटे यांच्यावरती कॉंग्रेसचे जिल्हा परिषदेचे भावी उमेदवार शरद नाना थोरात, त्यांचा मुलगा, पुतण्या यांच्या सह इतर ८ ते १० जणांनी कोकाटे यांच्या कार्यालयात घुसून फिल्मी स्टाईलने मारहाण केली आहे या मारहाणीत कोकाटे हे जखमी झाले असून. त्यांच्यावरती लोणी येथील प्रवरा ग्रामीण रुग्णालयात उपचार सुरू आहे.या घटनेचा सर्वच विभागा तील अधिकार्यांनी तीव्र शब्दात निषेध व्यक्त केला . बुधवारपासून काळ्या फिती लावून काम काज करण्याचा निर्णयही सर्वच विभागातील अधिका ऱ्यांनी घेतला आहे. या त्यांच्यावरती लोणी येथील प्रवरा ग्रामीण रुग्णालया मध्ये उपचार सुरू आहेत. या घटनेचा सर्व स्तरातून निषेध व्यक्त केला जात आहे

चैतन्य हॉस्पिटल
डॉ. जठार हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
- मेडि असिस्ट इन्शुरन्स प्रा.लि.
- पॅरामाऊंट हेल्थ इन्शुरन्स
- हेल्थ इंडिया इन्शुरन्स
- FHPL हेल्थ इन्शुरन्स
- इरिक्सन इन्शुरन्स प्रा.लि.
- बजाज आलियांझ इन्शुरन्स
- एसबीआय जनरल इन्शुरन्स
- ईस्ट वेस्ट असिस्ट हेल्थ केअर
- मेडसेव टीपीए प्रा.लि.
- जेनिन्स इंडिया टीपीए लि.
- ICICI लोम्बार्ड हेल्थ केअर
- टाटा एआयजी इन्शुरन्स
- रिलायन्स जनरल इन्शुरन्स
- मुख्यमंत्री सहाय्यता निधी (CMRF)

सर्व प्रकारचे मेडिक्लेम कॅशलेस सुविधा उपलब्ध

- चोलामंडलम हेल्थ इन्शुरन्स
- नॅशनल इन्शुरन्स कं.
- न्यू इंडिया इन्शुरन्स कं.
- निवा बुपा हेल्थ इन्शुरन्स
- युनायटेड इंडिया इन्शुरन्स कं.
- स्टार हेल्थ इन्शुरन्स कं.
- दि ओरिएंटल इन्शुरन्स लि.
- एचडीएफसी एर्गो इन्शुरन्स
- युनायटेड हेल्थकेअर लि.
- Go digit हेल्थ इन्शुरन्स कं.
- मणिपाल सिग्ना हेल्थ इन्शु.
- एम.डी.इंडिया हेल्थकेअर
- विडाल हेल्थकेअर प्रा.लि.
- पोलिस कुटुंब कल्याण आरोग्य योजना (MPKAY)

०२४२५ - २२४७६२, मोबा. ७०३८२७०३८२

अविवाहितांच्या, नवविवाहितांच्या, चाळीशीनंतरच्या स्त्री-पुरूषांच्या तसेच मधुमेही व व्यसनाधिनांच्या
सेक्स समस्या
हस्तमैथुनाचे दुष्परिणाम/स्वप्नदोष/धातुपात
शीघ्रपतन/असमाधान/कमजोरी/ शुक्राणुंची कमी
गुप्तरोग/ त्वचारोग/ नपुंसकत्व/ मानसिक नैराश्य



जर्मनमेड होमिओपॅथिक औषधे-शास्त्रोक्त मार्गदर्शन



डॉ. अभय मुथा (मनोलैंगिक विकार तज्ञ)
B.H.M.S., M.D.(A.M), M.D.(Acu)., P.G.(SEXOLOGY)
३० वर्षांचा प्रदीर्घ अनुभव (राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त)
अत्याधुनिक मशिनच्या सहाय्याने तपासणी करून औषधोपचार
(प्रत्येक नवीन रूग्णासाठी १ तास वेळ दिला जातो) ॲपॉईंटमेंट आवश्यक
१ लाखांहून अधिक रूग्णांवर यशस्वी उपचार
ISO मानांकन प्राप्त
सेक्स सुपर स्पेशालिटी होमिओपॅथिक क्लिनिक
विनायकनगर, नगर-पुणे रोड, अहिल्यानगर
www.sextreatment.in
94 22 23 90 13




कुटे हॉस्पिटल अँड लॅप्रोस्कोपी सेंटर
स्वास्थ्य रक्षणाय् रोग परिशमनाय्
डॉ. सोनाली प्र. कुटे (M.B.B.S.) Physician & Anasthhetist
डॉ. प्रदीप भाऊसाहेब कुटे (M.S.) Laproscopic Surgeon & Endoscopist
डॉ. निखील रहांगडाले Orthosurgeon
डॉ. सुनिल दिघे Cardiologist
डॉ. फैमुद्दीन शेख Medicine
- सर्जरी विभाग
- डायलिसीस विभाग
- हृदयरोग विभाग
- जॉईंट रिप्लेसमेंट
- अतिदक्षता विभाग
- सुपर स्पेशालिटी विभाग
- मेडिसीन विभाग
- स्पाईन सर्जरी
- अपघात विभाग
- न्यूरोविभाग
- अद्ययावत कॅथलॅब
- मॉड्युलर ऑपरेशन थिएटर
सर्व मेडिक्लेम व कॅशलेस सुविधा
पंतप्रधान व महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना
ॲम्ब्युलन्स व २४ तास अत्यावश्यक सेवा
8888882225
४० फुटी डीपी रोड, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
(०२४२५) २२६६८८, २२६६८६

दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर–४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर – ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायकक्षेत) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोस्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25

# जमीन महसूल संहितेत मोठी सुधारणा

## शर्तभंग प्रकरणे आता जिल्हा पातळीवरच निकाली

मुंबई (वार्ताहर)-

राज्यातील शासकीय जमिनींच्या व्यवहारातील 'शर्तभंग' नियमित करण्याची प्रक्रिया अधिक सुलभ आणि वेगवान होणार आहे. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी मांडलेले 'महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (दुसरी सुधारणा) विधेयक २०२६' (विधेयक क्र. २८) आज विधानसभेत एकमताने मंजूर करण्यात आले. या नवीन कायद्यामुळे आता छोट्या स्वरूपाचे शर्तभंग नियमित करण्याचे अधिकार जिल्हाधिकारी आणि विभागीय आयुक्तांना मिळणार असल्याने ९० टक्के प्रकरणांचा निकाल स्थानिक पातळीवरच लागणार आहे.

आतापर्यंत शासनाने कब्जेहक्काने किंवा भाडेपट्ट्याने दिलेल्या जमिनींच्या बाबतीत होणारे शर्तभंग नियमित करण्यासाठी महाराष्ट्र जमीन महसूल संहितेमध्ये (चडठउ) कोणतीही स्पष्ट कायदेशीर तरतूद नव्हती. हे काम केवळ शासकीय परिपत्रकांच्या आधारे केले जात होते. मात्र, या प्रक्रियेला कायदेशीर आधार नसल्याने अनेक प्रकरणे न्यायप्रविष्ट होत होती किंवा प्रलंबित राहत होती. ही उणीव दूर करण्यासाठी मंत्री बावनकुळे यांनी संहितेत कलम ३७ 'अ' आणि ३२८ 'अ' अंतर्गत नवीन सुधारणा सुचवली आहे.

महसूलमंत्री बावनकुळे म्हणाले की, आजवर अगदी छोट्या शर्तभंगासाठी देखील फाईल्स मंत्रालयात येत होत्या. यामुळे मंत्रालयावर कामाचा मोठा ताण होता आणि सर्वसामान्यांना छोट्या कामांसाठी मुंबईच्या वाऱ्या कराव्या लागत होत्या. आता आम्ही अधिकारांचे विकेंद्रीकरण करत आहोत. एक कोटी रुपयांपर्यंतची सुमारे ९० टक्के प्रकरणे आता जिल्हाधिकारी किंवा विभागीय आयुक्त स्तरावरच निकाली निघतील. केवळ अति-उच्च मूल्याची प्रकरणेच मंत्रालयाकडे येतील. विधेयक सभागृहात मांडले असता, त्याचे महत्त्व लक्षात घेऊन सर्वपक्षीय आमदारांनी याला पाठिंबा दिला. विधेयक मांडताना बावनकुळे यांनी या बदलाचा प्रशासकीय फायदा सभागृहाच्या लक्षात आणून दिला.

# व्हिजन कोचिंग इन्स्टिट्यूटच्या विद्यार्थ्यांसाठी विविध क्रीडा स्पर्धांचे भव्य आयोजन




संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)-

परीक्षा आणि अभ्यासाच्या प्रचंड तणावातून विद्यार्थ्यांना मुक्ती देण्यासाठी शैक्षणिक संस्थांनी क्रीडा क्षेत्राकडेही लक्ष देणे गरजेचे असल्याचे मत व्यक्त करताना, व्हिजन कोचिंग इन्स्टिट्यूटने संगमनेर येथील भाऊसाहेब थोरात क्रिकेट स्टेडियमवर विद्यार्थ्यांसाठी विविध क्रीडा स्पर्धांचे यशस्वी आयोजन केले. क्रिकेट, बास्केटबॉल, व्हॉलीबॉल, टेबल टेनिस, रस्सीखेच, बॅडमिंटन आदी अनेक स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांनी उत्साहाने भाग घेतला.

या स्पर्धांच्या बक्षिस वितरण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. दैनिक युवावार्ताचे संस्थापक व संपादक व पत्रकार सेवा संघ महाराष्ट्र, मुंबई यांचे अध्यक्ष किसन भाऊ हासे यांच्या शुभहस्ते बक्षिसे वितरित करण्यात आले. विद्या विद्यापीठ शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ. नामदेवराव गुंजाळ यांच्या अध्यक्षतेखाली हा सोहळा पार पडला. आपल्या भाषणात किसन भाऊ हासे म्हणाले, परिसाला स्पर्श झाला की सोने होते, तसेच या विद्यार्थ्यांच्या बाबतीत आहे. तुम्ही नशीबवान आहात की संगमनेरमध्ये एवढी उत्तम कोचिंग इन्स्टिट्यूट उभी राहिली आहे. या संस्थेत शिकत असल्याने तुम्ही निश्चितपणे आपल्या शिक्षणाला सोनेरी यश मिळवू शकाल. अभ्यासाबरोबरच खेळांचे महत्त्व अधोरेखित करताना ते पुढे म्हणाले, अभ्यास आणि खेळ यांचा समतोल राखणे आवश्यक आहे. व्हिजन कोचिंग इन्स्टिट्यूट हेच कार्य प्रभावीपणे करत आहे.

संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. हर्षवर्धन गुंजाळ व सेंटर हेड प्राध्यापक राहुल कुमार मिश्रा यांच्या अथक परिश्रमाने व सहकाऱ्यांच्या मेहनतीने ही संस्था आज नावारूपाला आली आहे. याचा मला अभिमान वाटतो, असेही किसन भाऊ हासे यांनी व्यक्त केले.

अध्यक्षस्थानावरून डॉ. नामदेवराव गुंजाळ यांनी आपल्या भाषणात सांगितले, व्हिजन कोचिंग इन्स्टिट्यूटमध्ये विद्यार्थी मेडिकल साठी नीट, व जेईई व इतर स्पर्धा परीक्षांची तयारी करतात. अभ्यासाचा प्रचंड तणाव मनावर येतो. या तणावातून मुक्ती मिळवण्यासाठी अशा क्रीडा स्पर्धांची आवश्यकता असते आणि आज ती पूर्ण झाली आहे. सर्व विजयी स्पर्धकांचे अभिनंदन करताना त्यांनी स्पर्धा आयोजनाबद्दल संस्थेचे डॉ. हर्षवर्धन गुंजाळ, प्रा. राहुल कुमार मिश्रा, प्रा. डॉ. ऐश्वर्या साळवे यांचे कौतुक केले. तसेच, सर्व विद्यार्थ्यांनी साठी स्पर्धांचे नियोजन करणाऱ्या प्रा. डॉ. ऐश्वर्या साळवे यांचे विशेष अभिनंदन केले. व्हिजन कोचिंग इन्स्टिट्यूट चे कार्यकारी अधिकारी डॉ. हर्षवर्धन गुंजाळ म्हणाले की, अभ्यास आपल्याला ज्ञान देतो तर क्रीडा आपल्याला जीवन जगायला शिकवते. मैदानावर खेळताना तुम्ही शिकता टीमवर्क, शिस्त, सहनशीलता आणि सर्वात महत्त्वाचं म्हणजे हार मानू न देणारी जिद्द. आम्ही विद्यार्थ्यांना केवळ गुणांमध्ये नाही, तर गुणवत्तेमध्ये घडवण्यावर भर देतो.

या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी दाखवलेल्या उत्साहामुळे व संस्थेच्या प्रयत्नांमुळे शैक्षणिक विकासाबरोबरच शारीरिक व मानसिक विकासाला चालना मिळाली. व्हिजन कोचिंग इन्स्टिट्यूटने संगमनेरच्या शैक्षणिक क्षेत्रात एक नवी दिशा निर्माण केली असल्याचे सर्वच मान्यवरांनी नमूद केले. स्पर्धा यशस्वी होण्यासाठी सुनील पांडव, संदेश गायकवाड, स्मृती महांतो, प्रा. चेतन शुक्ला, प्रा. अर्पित तिवारी, प्रा. अमन वर्मा यांनी सहकार्य केले. सर्व स्पर्धा यशस्वी पार पडल्या.

# शारदा शिक्षण संस्थेत स्नेहमिलन उत्साहात



संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)-

येथील शारदा शिक्षण संस्थेच्या विद्यमान चेअरमन सुवर्णाताई मालपाणी यांच्या संकल्पनेतून शिक्षक व शिक्षकेतर सहकाऱ्यांचे स्नेहमिलन कार्यक्रम मालपाणी हेल्थ क्लब येथे उत्साहात संपन्न झाले. कार्यक्रमाची प्रस्तावना मुख्याध्यापक उत्तम एरंडे यांनी केली. स्नेहमिलनाच्या प्रारंभी रस्सीखेच व संगीत खुर्ची यांसारखे मनोरंजनाचे खेळ घेण्यात आले. यानंतर शिक्षकांनी वैयक्तिक गीते, कविता, मिमिक्री, नाट्यछटा, समुह नाटिका व समुह भारुड सादर करून उपस्थितांचे मनमुराद मनोरंजन केले.


पुढील सत्रात शिक्षकांची गटानुसार विभागणी करून विविध विषय देण्यात आले. त्या विषयांवर समायोचित नाटिका सादर करत त्यांनी आपली सर्जनशीलता आणि अभिनय कौशल्य दाखवले. या कार्यक्रमातून शिक्षकांच्या सुप्त कलागुणांना वाव मिळाला. बालवाडी, माध्यमिक व प्राथमिक विभागातील शिक्षकांनी अतिशय मेहनतीने पूर्वतयारी करून प्रत्येकी दोन समूहगीते बसवली व त्यांचे विद्यालयाच्या संगीत वृंदाच्या साथीत स्नेहमिलन कार्यक्रमात उत्कृष्टरित्या सादरीकरण केले... ही समुहगीते सादर होत असताना शिक्षिकांनी फेर धरून नृत्य देखील केले, तसेच मा. अध्यक्षांनी त्यावर ठेका धरला आणि या समूहगीतांचा मनमुराद आनंद लुटला.

याप्रसंगी संस्थेच्या सहसचिव ॲड. ज्योतीताई मालपाणी यांनी प्रश्नोत्तरांच्या स्वरूपात मुख्याध्यापक उत्तम एरंडे यांची हलकी-फुलकी व हास्यनिर्मिती करणारी मुलाखत घेतली, ज्यामुळे कार्यक्रमात रंगत आली. तसेच उत्तम एरंडे यांनी केलेली राजकीय नेत्यांची मिमिक्री विशेष दाद मिळवून गेली. कार्यक्रमाच्या शेवटी शिक्षक व शिक्षकेतर सहकाऱ्यांमध्ये अंताक्षरीचे आयोजन करण्यात आले. सर्वांनी हिंदी व मराठी गाण्यांचा बहारदार आनंद घेत समूहगायनातून वातावरण अधिक रंगतदार केले.

या स्नेहमिलनात चेअरमन सुवर्णाताई मालपाणी यांनी सर्व खेळ, गीत, नाटिका, अंताक्षरी इ. मध्ये उत्साहाने सक्रीय सहभाग घेत सर्वांना प्रोत्साहित केले.

तसेच संस्थेचे खजिनदार मा. सुरेंद्रकुमार कासट, सहसचिव ॲड. ज्योतीताई मालपाणी आणि संस्थेतील सेवानिवृत्त मुख्याध्यापक व शिक्षकही उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अंबादास बुलाखे व प्रज्ञा डांगे यांनी केले. कार्यक्रमाच्या शेवटी सुवर्णाताई मालपाणी यांच्या वतीने आयोजित सुरुची भोजनाचा सर्वांनी आस्वाद घेतला. या स्नेहमिलनातून शिक्षक व शिक्षकेतर सहकाऱ्यांना नवी ऊर्जा व प्रेरणा मिळाल्याची भावना व्यक्त करण्यात आली.

# अशोक खरात दहावी परीक्षेत गणितात नापास



नाशिक (वार्ताहर)-

अशोक खरातच्या शैक्षणिक वास्तव समोर आलं आहे. दहावी परीक्षेत गणितात नापास झाल्याची माहिती समोर आले आहे. गुणपत्रिकेनुसार एकूण २५१ गुण, टक्केवारी सुमारे ३५.८८% तर मराठीमध्ये ३९ इंग्रजीत ३७ गणितात २८ विज्ञानात ६२ समाजशास्त्राचा ३८ आणि हिंदीमध्ये ४७ गुण मिळाले होते.


नाव बदलून 'अशोककुमार' तर कॅप्टन उपाधी लावून जहाजावर अधिकारी बनण्याचे स्वप्न पूर्ण केले असण्याची शक्यता वर्तवली जाते आहे. खरातचे खरे नाव लक्ष्मण असल्याचं समोर आलं आहे. सिन्नर तालुक्यातील कहांडळावडीमध्ये खरात वावी येथील माध्यमिक शाळेचा विद्यार्थी आहे. अंकशास्त्र शिकवणारा व्यक्ती स्वतःच गणितात अपयशी झाल्याचे दिसून आले आहे.

# उत्सव चैतन्याचा, जन्मदिवस प्रभु श्री रामचंद्रांचा...

आज प्रभु श्री रामचंद्र यांचा जन्मदिवस. म्हणजेच अलौकिक भाग्याचा दिवस आहे. मन प्रसन्न करणारा दिवस आहे. प्रत्येक हिंदू बांधवांची अस्मिता म्हणजे श्री राम होय. श्रीरामांचे चरित्र मनोहर व उत्तुंग आहे.

राम म्हणजे निर्लोभीपणाचा आदर्श. तीन तीन राज्य मिळाले असताना ते सोडून दिली. प्रभू रामचंद्र आपली नैतिक आणि कौटुंबिक आदर्श आहेत. आज-काल सांस्कृतिक आणि आपली निष्ठा श्रद्धा केंद्रे नष्ट करण्याचे काम सुरू आहे. राम हे काल्पनिक होते, असेही म्हणणारे महाभाग आहेत. अशा लोकांचा आपण विचार न केलेलाच बरा. आपले आदर्श, आपली संस्कृती टिकवण्यासाठी आपण प्रयत्नशील झाले पाहिजे. कोणीही यावे आणि श्रीरामां बद्दल उलट सुलट बोलावे, याला आपण सडेतोड उत्तर दिले पाहिजे. आपण रामकृष्ण यांचे उपासक आहोत. सामाजिक, सांस्कृतिक, नैतिक, कौटुंबिक, आध्यात्मिक मूल्य टिकवण्यासाठी आपण श्रीरामांची तेजस्वी विचारधारा घरोघर पोचवली पाहिजे. श्रीरामांसारखे उज्वल, धवल, भव्य आणि पवित्र चरित्र कोठेही आढळणार नाही. या चरित्राला कोठेही नाव ठेवण्यासारखी जागा नाही. प्रभू रामचंद्र आपल्या जीवनाचे सम्राट आहेत. श्रीराम म्हणजे चारित्र्याचा आदर्श, जीवनाचा आदर्श आणि सर्व गुणांची परिसीमा. स्वच्छ चरित्र, शुभ्र चरित्र आणि सर्वोत्तम म्हणजे श्रीराम होय.

दैवी जीवनाच्या उच्च मर्यादाशील जीवन जगण्याच्या मर्यादेत राहून आपली संस्कृती चिरकाल टिकून राहावी, म्हणून रात्रंदिवस प्रयत्न करणाऱ्या श्रीरामांना शतकोटी प्रणाम. रावणाला मारल्यानंतर रामाने त्या राज्य घेतले नाही. याचे कारण अपि स्वर्णमयी लंका नमे रोचते, लक्ष्मण, जननी जन्मभूमीस्य स्वर्गादपि गरीयसी. हे लक्ष्मणा, मला सुवर्णाची लंका आवडत नाही. माझी माता आणि जन्मभूमी स्वर्गाहून श्रेष्ठ आहे. प्रभू रामचंद्रांचे जीवन आणि शिकवण आध्यात्मिक उन्नती आणि अस्तित्वाच्या गुंतागुंतीवर मार्गक्रमण करण्यासाठी शहाणपण देतात. हिंदू धर्मात प्रभू रामचंद्रांचे अपार महत्व



त्यांच्या दैवी उत्पत्तीच्या पलीकडे आहे. भक्तीची शक्ती आणि दृढनिष्ठा मर्यादा म्हणजे श्रीराम होय. दया, सत्य, करुणा, धर्म, मर्यादा, न्यायाचे प्रतीक, परिपूर्ण मानवाचे आदर्श म्हणजे श्री राम होय.

प्रभू रामचंद्र हे भक्ती आणि त्यागाचे मूर्त स्वरूप मानले जाते. आई वडील, पत्नी, राजा या नात्याने त्यांची कर्तव्य, भक्ती सर्वोच्च नैतिक मानकांचे प्रतिबिंब आहे. रामांनी मूल्यांशी कधीच तडजोड केली नाही. नेतृत्वाचा धडा, जबाबदारीची जाणीव, नम्रता, सद्गुण, न्याय, धैर्यवान याचे उत्तम उदाहरण म्हणजे प्रभू रामचंद्र होय. विजय आणि पराजय या दोन्हीमध्ये ज्यांनी नम्रता दाखवली, ते श्रीराम होय. भगवान राम आणि भगवान श्रीकृष्ण यांचा आदर्श मानवा पुढे आहे. संपूर्ण मानव जातीसाठी ते पूजनीय आहेत. आजही खेडेगावात दोन लोक एकमेकांना भेटल्यावर राम राम म्हणतात.

त्याचा अर्थ तुझ्यातल्या रामाला नमस्कार आणि माझ्यातल्या रामालाही नमस्कार. राम हे नावच चैतन्यमय आहे, प्रेरणा देणारे आहे, उत्साह देणारे आहे. वीर रस निर्माण करणारे आहे, आणि म्हणून राम तत्व जोपर्यंत आपल्या मध्ये आहे, तोपर्यंत आपण आहोत. रामतत्त्व निघून गेल्यावर, याच्यात राम राहिला नाही, याला उचला असे म्हणतात. हा राम नामाचा महिमा आहे. समाज जेव्हा भोग प्रदान होतो, पशुतुल्य जीवन जगतो, त्यावेळी नीतिमूल्य, भक्ती, संस्कार शिकवण्यासाठी प्रभू रामचंद्रांची गरज असते. प्रभू रामचंद्र भगवान श्रीकृष्ण हे आपल्या संस्कृतीचे शिरोमणी आहे. रामोभूत्वा रामं यजेत. म्हणजे राम होऊनच रामाची पूजा केली पाहिजे.

मर्यादा पुरुषोत्तम प्रभू रामचंद्र म्हणजे जगातील अत्यंत श्रेष्ठ आणि सर्वोच्च गुणांचा समुच्चय. राम चरित्र हे वास्तवतेचा विषय आहे. हे चरित्र श्रेष्ठ, विशाल आणि प्रतिभा शाली आहे. आपत्ती दुःख सहन करता करता रामाने देवत्व निर्माण केले. वाल्मीकिंनी रामांचे मानव म्हणून चरित्र लिहिले आहे. कारण रावणाला मानवाशिवाय दुसरा कोणीही मारू शकणार नव्हते. हे वरदान होते. ज्यावेळी रावण वधा नंतर दैवत्व दाखवण्याचा प्रसंग आला, त्यावेळी प्रभू रामचंद्र म्हणाले, मी माणूसच आहे. आपल्यामध्ये देवत्व आपणच निर्माण करू शकतो, हे रामाने दाखवून दिले.

स्वार्थ त्याग म्हणजे प्रभू रामचंद्र, प्रेम मूर्ती म्हणजे राम. भावना आणि कर्तव्य यामध्ये राम यांनी कर्तव्याला महत्त्व दिले. एक अलौकिक पुत्र, लोकोत्तर बंधू, अलौकिक मित्र, लोकोत्तर शत्रू, आदर्श राजा म्हणजे प्रभू रामचंद्र होय. जीवनातील नैतिक मूल्यांचे अंतिम टोक ध्यानात येण्यासाठी आणि पाशवी वृत्तीचा नाश करण्यासाठी प्रभू श्री रामचंद्र मानवी रूपात येतात. एक चारित्र संपन्न शासक कसा असतो, हे त्यांनी दाखवले आहे. नवीन पिढीने श्री प्रभू रामचंद्र यांचे चरित्र वाचावे. आपणही पुढील पिढीला ते समजून सांगावे.

कारण हिंदवी स्वराज्याची स्थापना करणारे छत्रपती शिवाजी महाराज यांनी सुद्धा लहानपणी जिजामाता यांच्याकडून रामायणातल्या गोष्टी ऐकल्या होत्या, आणि त्यातून त्यांच्यामध्ये वीर रस निर्माण झाला होता. त्यातून हिंदवी स्वराज्याची निर्मिती झाली. रामायणामध्ये भरत म्हणतो, मला राज्य नको राम पाहिजे, मला पद नको मला रामाच्या पादुका हव्यात, मला सत्ता नको सत्य हवे. तेव्हाच राम राज्य निर्माण होते. आज तर राम शब्द उच्चाराला सुद्धा काही जणांना लाज वाटते. काही राम भक्त असून सुद्धा भीतीपोटी रामाचे नाव घेत नाही. असो, त्यांच्याशी आपल्याला घेणे नाही. कारण राम हे सर्वांचेच आहेत.

या जगात कौटुंबिक, सामाजिक, नैतिक, राजकीय मर्यादेत राहून पुरुषोत्तम कसा होऊ शकतो, हे प्रभू रामचंद्र यांचे जीवन समजावते. विचारात आणि विकारात आणि व्यावहारिक सर्व कार्यात प्रभू रामचंद्र यांनी मानवी मर्यादा सोडली नाही. आज प्रभू रामचंद्र यांचा जन्मदिवस. आपणही जन्मदिवस साजरा करताना त्यांच्यामधील काही गुण आत्मसात करण्याचा प्रयत्न करावा. आपल्याला माणूस म्हणून जगण्याचे भान प्रभू रामचंद्र यांनी दिले. संकटांशी सामना कसा करावा, याचेही भान दिले.

राम राज्य एकदम निर्माण होत नाही, त्यासाठी झिजावे लागते. सत्ता तुरा नाम भयम न लज्जा, या लोकांनी प्रभू श्रीरामचंद्र यांचे चरित्र वाचावे, आणि त्यांचा आदर्श घ्यावा. प्रभू श्रीरामचंद्र यांच्या चरणी नमस्कार. आज त्यांच्या जन्मदिवसानिमित्त हा शब्द प्रपंच.

**प्रा. शशांक गंधे, संगमनेर**
**मो. ९८९०१६३६४२**

# राज्यात अल्पवयीन मुलांच्या सोशल मीडिया वापरावर नियंत्रण येणार

मुंबई (वार्ताहर)-

राज्यात अल्पवयीन मुलांच्या सोशल मीडिया वापरावर नियंत्रण आणण्याचे संकेत माहिती माहिती तंत्रज्ञान मंत्री आशिष शेलार यांनी मंगळवारी विधानसभेत दिले. याबाबत शासनाने नेमलेल्या टास्क फोर्सच्या अहवालानंतरच ठोस धोरण किंवा कायदा तयार केला जाईल, असे शेलार यांनी नमूद केले

आमदार राजेश पवार यांनी सोशल मीडिया, ऑनलाइन गेम्स आणि डिजिटल प्लॅटफॉर्मच्या वाढत्या वापरामुळे अल्पवयीन मुलांवर होणाऱ्या परिणामांबाबत लक्षवेधी उपस्थित केली होती. त्यावर उत्तर देताना मंत्री आशिष शेलार म्हणाले, इतर राज्यांनी सोशल मीडिया वापर बंदीसंबंधी केवळ घोषणा केल्या असून, ठोस कायदे अद्याप अस्तित्वात आणलेले नाहीत. मात्र, महाराष्ट्राने या विषयाकडे गांभीर्याने पाहत दि. २ फेब्रुवारी २०२६ रोजी टास्क फोर्स स्थापन केला आहे. या टास्क फोर्सकडून अल्पवयीन मुलांचा सोशल मीडिया वापर, त्याचे मानसिक, शारीरिक व शैक्षणिक परिणाम तसेच डिजिटल जाहिरातींचा प्रभाव यांचा अभ्यास करण्यात येत आहे. तसेच राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय नियमांचा अभ्यास करून योग्य कायदेशीर, तांत्रिक व प्रशासकीय उपाय सुचवले जाणार आहेत.

१८ वर्षांखालील युवाशक्तीच्या सोशल मीडिया किंवा मोबाईल वापरावर सरसकट बंदी घालणे योग्य ठरणार नाही, कारण शिक्षण व्यवस्थेत इंटरनेटचा महत्त्वाचा उपयोग आहे. त्यामुळे संतुलित दृष्टिकोन ठेवणे आवश्यक आहे. टास्क फोर्सला तीन महिन्यांचा कालावधी देण्यात आला असून, त्याच्या अहवालानंतर राज्य शासन राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय नियामक चौकटीचा अभ्यास, माहिती तंत्रज्ञान कायदे सुधारणा, एज व्हेरिफिकेशन, स्क्रीन टाइम लिमिट, तसेच शाळांमध्ये डिजिटल सेफ्टी शिक्षण यासारख्या उपाययोजनांवर निर्णय घेईल. तसेच विद्यार्थ्यांसह शिक्षक आणि पालकांसाठीही डिजिटल सुरक्षिततेबाबत प्रशिक्षण आणि जनजागृती कार्यक्रम राबवण्याबाबत विचार सुरू असल्याचे मंत्री शेलार यांनी सांगितले.

# गॅस टाकीसाठी आता २५ ऐवजी ३५ दिवसांनंतर बुकिंग

**संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)–**

पुन्हा एकदा गॅस कंपन्यांनी डझ्रञ्ज सिलिंडरच्या बुकिंगशी संबंधित नियमांमध्ये बदल करण्यात आले आहेत. नवीन नियमांनुसार आता २५ नाही,तर ३५ दिवसांनी सिलिंडर बुकिंग करता येणार आहे. घरगुती गॅसचा काळाबाजार रोखणे, तसेच वितरण व्यवस्थेतील पारदर्शकता वाढवणे या उद्देशाने, दोन सिलिंडरच्या बुकिंगमधील कालावधी आता वाढवण्यात आला आहे. गॅस वितरकांनी मंगळवारी या नवीन नियमाची घोषणा केली. या नियमांमुळे गृहिणींच टेन्शन वाढणार आहे. नव्याने लागू झालेल्या नियमाचा फटका विशेषतः 'डबल-सिलिंडर कनेक्शन' असलेल्या ग्राहकांना बसणार आहे. ग्राहकांना आता, त्यांच्या १४.२ किलोच्या गॅस सिलिंडरसाठी पुढील रिफिल बुक करण्यापूर्वी, मागील डिलिव्हरीच्या तारखेपासून ३५ दिवस वाट पाहावी लागणार आहे.

संगमनेरकरांनी गौरविलेले
।।जय श्रीराम।।
सुपर शॉपी
निवडक किराणा, ड्रायफुट, कॉस्मेटिक
जीवन ज्योती, गणेशनगर, संगमनेर
एस. आर. थोरात दुध व बाय प्रोडक्टस्
प्रोप्रा. अशोक रा. जाधव
फोन (०२४२५) २२१७८८,२२३६२९, मोबा. ९८२२४२५५२२
क्रेडीट कार्ड व डेबिट कार्ड वापरण्याची सुविधा

मणके विकार, गुडघेविकार, अस्थिविकार
सुरिक्षत, खात्रिशीर व परीपूर्ण उपचारासाठी आजच भेटा
डॉ. सुभाष दत्तात्रय मंडलिक
मणके विकार, गुडघेविकार
व अस्थिविकार चिकीत्सक
(२४ वर्षांचा प्रदिर्घ अनुभव)
मंदना मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
लक्ष्मी नगर, रहाणे मळा, संगमनेर
संपर्क - ९८२२७०९०३०

जिथे काळजी आणि
उपचार एकत्र येतात...
ताम्हाणे हॉस्पिटल
• मेडिसिन • सर्जरी
• स्त्रीरोग – प्रसुति
• मुळव्याध–भगंदर–फिशर
• लेझर सेंटर
डॉ. ताम्हाणे विशाल वसंत
(M.S.) शल्य
कन्सल्टंट जनरल व लेझर सर्जन
डॉ. ताम्हाणे रुपाली विशाल
स्त्रीरोग / प्रसुती चिकित्सक
इंदिरा नगर, गल्ली नं. १०, संगमनेर
: Help Line :
7219 100 100

शेतकऱ्यांचा श्वास ! ग्राहकांचा विश्वास !!
राजहंस
दर्जेदार राजहंस दूध व दूधजन्य पदार्थ
संगमनेर तालुका सह. दूध उत्पा. व प्रक्रिया संघ मर्या.
अमृतनगर (घुलेवाडी), ता. संगमनेर, जि. अहमदनगर
(०२४२५) २२५४१०, २२५५१०, २२६१६१, २२६१६२
www.rajhansmilk.com rajhansmilk@gmail.com



# संगमनेरात साबणाच्या पाण्याने धुतलेल्या खोबऱ्याची विक्री, नागरिकांच्या आरोग्याशी खेळ!



छाया– प्रसाद शिरसाठ (सुतार), संगमनेर

संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)- संगमनेर शहर पोलीस ठाण्यापासून हाकेच्या अंतरावर मानवी आरोग्याला घातक ठरेल असा एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे. बाजारात विक्रीसाठी येणारे सुके खोबरे (वाट्या) चकाकी आणण्यासाठी चक्क साबणाच्या फेसयुक्त आणि अस्वच्छ पाण्याने धुवून वाळवली जात असल्याचे पाहायला मिळत आहे. या प्रकारामुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

शहरातील मुख्य भागांत, जिथे पोलिसांची सतत वर्दळ असते, अशा परिसरात काही लोक जुने किंवा खराब झालेले खोबरे स्वच्छ करण्यासाठी साबणाच्या पाण्याचा वापर करत आहेत. प्राप्त छायाचित्रांमध्ये स्पष्टपणे दिसत आहे की, एका टबमध्ये साबणाचे पाणी घेऊन त्या त खोबऱ्याच्या वाट्या टाकल्या जात आहेत. साबणामुळे या वाट्यांवरील घाण निघून त्यांना पांढरीशुभ्र चकाकी येते. त्यानंतर हे खोबरे उघड्यावर रस्त्याच्या कडेला वाळत घातले जाते.

खोबरे हे खाद्यपदार्थांमध्ये मोठ्या प्रमाणावर वापरले जाते. साबणामध्ये असणारे कास्टिक सोडा आणि इतर रसायने खोबऱ्यात मुरल्यामुळे ते शरीरासाठी विषारी ठरू शकतात. असे खोबरे खाल्ल्याने पोटाचे विकार, विषबाधा किंवा दीर्घकाळ वापरामुळे गंभीर आजार होण्याची शक्यता तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे.

विशेष म्हणजे, हा सर्व प्रकार पोलीस ठाण्याच्या अगदी जवळ सुरू असतानाही अन्न व औषध प्रशासन (ऋऊ-) किंवा स्थानिक नगरपालिकेचे याकडे लक्ष कसे गेले नाही, असा सवाल नागरिक विचारत आहेत. सणासुदीच्या काळात किंवा रोजच्या जेवणात वापरले जाणारे हे खोबरे थेट ग्राहकांच्या ताटात जात आहे.

**आम्ही श्रद्धेने आणि आरोग्यासाठी खोबरे खरेदी करतो, मात्र अशा प्रकारे जर त्यावर रसायनांची प्रक्रिया केली जात असेल, तर ही शुद्ध फसवणूक आहे, अशा भावना ग्राहकांनी व्यक्त केल्या आहेत. याप्रकरणी संबंधित व्यक्तींवर कठोर कारवाई करून अशा प्रकारचे भेसळयुक्त अन्नपदार्थ जप्त करावेत, अशी मागणी आता जोर धरत आहे. सावधाण, जर आपण खोबरे खरेदी करताना ते नैसर्गिक रंगाचे आहे की त्याला अवाजवी पांढरेपणा (चकाकी) आहे, याची खात्री नागरिकांनी करावी.**

# राजकीय जाहिरातींसाठी पूर्व प्रमाणीकरण बंधनकारक - जिल्हा माहिती अधिकारी

अहिल्यानगर (जिल्हा माहिती अधिकारी)- निवडणूक काळात इलेक्ट्रॉनिक माध्यमे, केबल नेटवर्क, सोशल मीडिया तसेच डिजिटल प्लॅटफॉर्मवर राजकीय जाहिराती प्रसारित करण्यापूर्वी माध्यम प्रमाणीकरण समितीची पूर्व मंजुरी घेणे बंधनकारक आहे. मुद्रित माध्यमांमध्येही मतदानाच्या दिवशी व त्याच्या आधीच्या कालावधीत जाहिरातींसाठी विशेष नियम लागू असल्याची माहिती जिल्हा माहिती अधिकारी सुरेश पाटील यांनी दिली.

राहुरी विधानसभा मतदारसंघ पोटनिवडणूक २०२६ च्या अनुषंगाने जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित जिल्हास्तरीय माध्यम प्रमाणीकरण समिती सदस्य व माध्यम कक्षातील अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या प्रशिक्षण कार्यक्रमात ते बोलत होते. या प्रशिक्षण कार्यक्रमास जिल्हा सूचना व विज्ञान अधिकारी पवन टेंभुर्णे, आकाशवाणीचे कार्यक्रम प्रमुख सुदाम बटुळे, ज्येष्ठ पत्रकार तथा समिती सदस्य महेश देशपांडे, पोलीस निरीक्षक सुदाम काकडे, तालुका कृषी अधिकारी बापूसाहेब शिंदे, माहिती अधिकारी अमोल महाजन यांच्यासह संबंधित अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

श्री. पाटील म्हणाले, माध्यमांमध्ये प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, जाहिराती व सोशल मीडिया पोस्टचे काटेकोर परीक्षण करून पेड न्यूज व दिशाभूल करणारी माहिती रोखणे आवश्यक असल्याचे सांगितले. पेड न्यूजची ओळख पटवणे, संशयित प्रकरणांवर नोटीस बजावणे, उमेदवाराचे स्पष्टीकरण घेणे, या प्रक्रियेची सविस्तर माहितीही त्यांनी दिली.

फेक न्यूज व द्वेषपूर्ण भाषणांवर त्वरित कारवाई करण्यासाठी सोशल मीडिया मॉनिटरिंगचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले. मतदानाच्या ४८ तास आधी लागू होणाऱ्या शांतता कालावधीत प्रचारबंदी, एक्झिट पोलवरील निर्बंध व माध्यमांनी पाळावयाच्या नियमांबाबत मार्गदर्शन करण्यात आले. मतदान व मतमोजणी दिवशी गोपनीयता राखणे आवश्यक असल्याचे श्री. पाटील यांनी स्पष्ट केले.

निवडणूक प्रक्रियेची पारदर्शकता व निष्पक्षता राखण्यासाठी माध्यमांचे प्रभावी नियमन आवश्यक असून, माध्यम कक्षामार्फत पत्रकारांना आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यावर भर देण्यात आला. आगामी पोटनिवडणुकीत आचारसंहितेची प्रभावी अंमलबजावणी होऊन मुक्त, निष्पक्ष व पारदर्शक निवडणूक पार पाडण्यास या प्रशिक्षणामुळे मदत होईल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

# चंद्रशेखर चौकातील श्रीराम मंदिराचा जीर्णोद्धार



## रामनवमी उत्सवाची जय्यत तयारी

**संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)–** संगमनेर शहरातील चंद्रशेखर चौक येथील पुण्यश्लोक श्रीमती अहिल्याबाई होळकर यांनी जीर्णोद्धार केलेले प्रभू श्रीराम मंदिर काही वर्षांपूर्वी मोडकळीस आले होते. मंदिरातील मूर्तीही जीर्ण झाल्याने नव्याने जीर्णोद्धार करण्याची गरज निर्माण झाली होती. दिनांक ८ मे २००२ रोजी मंदिराचे पूर्वीचे वहिवाटदार कै. महादेव लक्ष्मण उपासनी यांचे पुत्र शरद महादेव उपासनी व सुरेश महादेव उपासनी (सध्या पुणे) यांच्या संमतीने कै. कुंदनसिंग महावीर परदेशी, कमलाकर विश्वनाथ भालेकर व सोमनाथ गोपाळ पराई यांना जीर्णोद्धाराची जबाबदारी देण्यात आली. त्यानंतर मंदिराच्या दुरुस्ती व पुनर्बांधणीचे काम सुरू झाले.

संगमनेरचे आर्किटेक्ट अरविंद वैद्य यांनी मंदिराचा आराखडा तयार केला, तर कॉन्ट्रॅक्टर राजेश भालेराव यांनी बांधकामाची जबाबदारी पार पाडली. दरम्यान, ३ नोव्हेंबर २००७ रोजी कै. कुंदनसिंग परदेशी यांचे निधन झाल्याने काम काही काळ अर्धवट राहिले. मात्र, विनय गुने, कमलाकर भालेकर, सोमनाथ पराई, भगवान गीते, गिरीश देशपांडे यांसह चंद्रशेखर चौकातील कार्यकर्त्यांनी पुढाकार घेत देणग्या गोळा केल्या आणि शहरातील दानशूर नागरिकांच्या मदतीने मंदिराचा जीर्णोद्धार पूर्ण करण्यात आला.

मंदिरातील नवीन मूर्ती जयपूर येथील सनातन धर्म मूर्ती भंडार येथून आणण्यात आल्या. या रामदरबारातील मूर्तींसाठी लागणारा संपूर्ण खर्च चंद्रशेखर चौकातील व्यापारी कै. वसंतराव कोळपकर यांनी केला असून, त्यांनी त्या मंदिरास समर्पित केल्या आहेत. मंदिराचा प्राणप्रतिष्ठा सोहळा १७ मार्च ते २१ मार्च २०११ दरम्यान पाच दिवसांच्या धार्मिक विधींनी पार पडला. हा सोहळा संगमनेरचे पुरोहित भाऊ जाखडी व त्यांच्या टीमने संपन्न केला. विशेष म्हणजे, मंदिरात श्रीराम नवमी निमित्त बांधण्यात येणारा पाळणा चंदनाच्या लाकडाचा असून, तो श्रीराम गणपुले यांनी समर्पित केला आहे. सध्या मंदिराचा कारभार 'श्रीराम मंदिर ट्रस्ट'च्या माध्यमातून चालविला जात असून, अध्यक्ष कमलाकर भालेकर, उपाध्यक्ष सोमनाथ पराई व विनय गुने यांच्यासह इतर सदस्य कार्यरत आहेत.

दरम्यान, २६ मार्च रोजी रामनवमी उत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला जाणार आहे. या दिवशी दुपारी १२ वाजता श्रीराम जन्मोत्सव होणार असून, सायंकाळी ६ वाजता महिलाशक्तीच्या वतीने रामरक्षा व हनुमान चालीसा पठण करण्यात येणार आहे. त्यानंतर सायंकाळी ७ वाजल्यापासून भाव-भक्ती गीतांचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या उत्सवात गावातील सर्व भक्तमंडळी मोठ्या संख्येने सहभागी होतात.

# आमदार अमोल खताळांच्या सहकार्याने तीन दिवसांत दिव्यांगाला मिळाली इलेक्ट्रिक सायकल



संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)- संगमनेर शहराजवळील सुकेवाडी येथील महागणपती मंदिरात दोन्ही पायाने दिव्यांग असणारे बाबासाहेब काशिनाथ भवर यांना पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील व आमदार अमोल खताळ यांच्या माध्यमातून अवघ्या तीनच दिवसात इलेक्ट्रिक तीन चाकी सायकल मिळाल्याने त्यांच्या आयुष्यामध्ये नवा प्रकाश पडला आहे. जन्मतःच दोन्ही पायाने दिव्यांग असलेले बाबासाहेब भवर यांना चालता येत नसल्यामुळे त्यांना दैनंदिन जीवनात मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. तीनचाकी सायकल मिळावी म्हणून त्यांनी अनेक ठिकाणी अर्ज करून मदतीची अपेक्षा व्यक्त केली होती.

मात्र त्यांना सायकलीची मदत कोणीही करू शकले नाही. ही बाब महायुतीचे कार्यकर्ते तेजस गुंजाळ यांच्या लक्षात आली. भवर बाबांची व्यथा मांडणारा व्हिडिओ गुंजाळ या तरुणाने सोशल मीडियावर प्रसारित केला. हा व्हिडिओ आमदार खताळ यांच्या जनसंपर्क कार्यालयाच्या निदर्शनास आला. तत्काळ दिव्यांग भवर बाबांच्या व्हिडिओची दखल घेत आमदार खताळ यांनी लगेचच पालकमंत्री विखे पाटील यांच्या विळदघाट कार्यालयाशी संपर्क साधून भवर बाबांना इलेक्ट्रिक तीन चाकी सायकल मिळावी यासाठी पाठपुरावा केला. त्यांच्या प्रयत्नांना यश येत अवघ्या दोन ते तीन दिवसांतच भवर बाबांसाठी इलेक्ट्रिक तीन चाकी सायकल उपलब्ध करून दिली.

यानंतर भवर बाबांना आमदार खताळ यांच्या जनसंपर्क कार्यालयात बोलावून घेत, नीलम खताळ यांच्या हस्ते सन्मानपूर्वक सायकल प्रदान करण्यात आली. अवघ्या दोन-तीन दिवसातच सायकल मिळाल्यानंतर भवर बाबांच्या चेहऱ्यावर समाधान आणि आनंद स्पष्टपणे दिसत होता. यावेळी नीलम खताळ यांनी अर्थसंकल्पीय अधिवेशनानिमित्त मुंबईत असलेले आमदार अमोल खताळ यांच्याशी व्हिडिओ कॉलद्वारे भवर बाबांची थेट संवाद साधून दिला. बाबांचा चेहरा खुललेला पाहून आपण एका दिव्यांग वयोवृद्धाला सायकल मिळवून दिल्याचे समाधानही आमदार खताळ यांना वाटले.

मी अनेक ठिकाणी अर्ज करूनही मला तीन चाकी सायकल मिळाली नाही. मात्र पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि आमदार अमोल खताळ यांच्याकडे कोणताही अर्ज न करता मला सायकल उपलब्ध करून दिली. त्याबद्दल मी त्यांचा मनापासून आभारी आहे.

-बाबासाहेब भवर (दिव्यांग)

# उपप्राचार्य डॉ. अशोक दातीर यांचा सेवापूर्ती सोहळा उत्साहात




अकोले (युवावार्ता प्रतिनिधी)- अकोले येथील अकोले तालुका एज्युकेशन सोसायटीच्या अगस्ती कला, वाणिज्य व दादासाहेब रूपवते विज्ञान महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रोफेसर डॉक्टर अशोक मारुती दातीर यांच्या सेवापूर्तीनिमित्त आयोजित गौरव समारंभ शनिवारी संध्याकाळी अतिशय शानदारपणे पार पडला. त्यानिमित्ताने प्रेरणास्पंदन या त्यांच्याविषयी विद्यार्थी, सहकारी, नातेवाईक यांनी लिहिलेल्या आठवणी सांगणाऱ्या छान स्मरणिकेचे प्रकाशनही करण्यात आले.

याप्रसंगी अशोकराव दातीर यांचा सेवापूर्ती सन्मान करण्यासाठी अहमदनगर जिल्हा मराठा शिक्षण संस्थेचे पदाधिकारी दीपकराव दरे, पुणे विभागाच्या सार्वजनिक बांधकाम प्रदेश मुख्य अभियंता इंजिनिअर राजेंद्रजी रहाणे, संगमनेर येथील प्रथितयश अस्थिरोग शल्यचिकित्सक व सायकलपटू आयर्नमॅन डॉक्टर संजय विखे, अकोले तालुका एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष इंजिनिअर सुनील दातीर, सचिव सुधाकरराव देशमुख, त्याचबरोबर सरांबरोबर प्रेम करणारे त्यांचे मित्र, नातेवाईक व विद्यार्थी या कार्यक्रमासाठी अगत्याने उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक दैनिक युवावार्ता चे संपादक किसन भाऊ हासे यांनी केले. पाहुण्यांचा परिचय इंजिनीयर दत्तात्रय निवृत्ती बरकले यांनी करून दिला. याप्रसंगी फर्ग्युसन महाविद्यालयाच्या भौतिकशास्त्र विभाग प्रमुख डॉ. नंदकुमार मंडलिक, हरीभाई देसाई कॉलेजचे डॉ. शशिकांत गुंजाळ, ज्ञानप्रबोधिनी चे श्री. बाणाईत तसेच सत्यानिकेतन संस्थेच्या सर्वोदय ज्यु. महाविद्यालयाचे माजी उपप्राचार्य लहानू परबत, बी.एस.टी. ज्यु. महाविद्यालयाचे माजी उपप्राचार्य श्री. एम. वाय. दिघे, श्री. ब्रिजमोहन बिहाणी, सौ. मंगल भाटे, आर्की. सौ. स्वाती विखे, श्री. एम. बी. वाकचौरे व सौ. अनुजा सहाणे यांनी याप्रसंगी आपली मनोगते व्यक्त केली.

CorelDRAW
Ps
Ai
Id
WE ARE HIRING
JOIN OUR TEAM
GRAPHIC DESIGNER
Send Resume on Whatsapp
Contact : 7720046005

INVOFIX
शासनामार्फत मिळणारी सबसिडी
आजच सोलर सिस्टीम लावा व आपले लाईट बिल शुन्य करा
1KW 30,000/- Rupees
2KW 60,000/- Rupees
3KW 78,000/- Rupees
सौर उर्जा आजची गरज.. उद्याची बचत..
उपलब्ध सुविधा
१. बँक लोन सुविधा उपलब्ध
२. विज बिल शुन्य करा
३. मोफत मार्गदर्शन
४. फ्री साईट व्हिजीट
५. एक्सपर्ट टिम, क्वालिटी वर्क
PM SURYA GHAR
आजच योजनेचा लवकरात लवकर लाभ घ्या व भरघोस सबसिडी मिळवा.
Invofix Solution Pvt. Ltd., स्वागत मंगल कार्यालया समोर, अकोले बायपास रोड, संगमनेर ४२२६०५, जि. अहिल्यानगर.
7030334486
7030334494

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात
अमृतवाहिनी सह. बँक लि. घुलेवाडी
आर्थिक अडचण आहे का?
काळजी करु नका !
सोनेतारण कर्ज
कमीत कमी व्याजदर
जास्तीत जास्त कर्ज
SMBT BANK
बँकेच्या विविध सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी आजच आपल्या जवळच्या शाखेशी संपर्क साधावा.
* कर्ज रक्कम वाढ | * कर्ज व्याजदर कमी | * कमीत कमी कागदपत्रे
सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी जवळच्या शाखेशी संपर्क साधा
- शाखा - घुलेवाडी (मुख्यशाखा), मार्केट यार्ड, इंजि. कॉलेज विस्तार कक्ष, मेनरोड, तळेगाव, साकूर, घारगाव, आश्वी बु||, संगमनेर खुर्द, निमोण, राहाता






दैनिक **युवावार्ता**

परिवर्तनाचा पुरस्कर्ता

Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com

तिकीट न लावण्याचा पोष्ट परवाना : WPP - 264 ◆ RNI No. MAHMAR/2007/24252 ◆ पोष्टाचा परवाना क्रमांक BII/RNP/SRP/25/2023-25









वर्ष १९ वे । अहिल्यानगर । अंक ७४ । किंमत - ४ रू । संपादिका - सुशीला किसन हासे (बी.ए.) । संस्थापक - किसन भाऊ हासे (बी.जे.) ९८२२०३९४६० । कार्य. संपादक - सुदीप किसन हासे (एम.ई.कॉम्प्.) गुरूवार । २६/०३/२०२६ । पान - ६


















# राजापूरकरांनी माधवराव हासे यांना दिला अखेरचा निरोप

युवावार्ता (प्रतिनिधी)

**राजापूर** - संगमनेर तालुक्यातील राजापूर गावचे सुपुत्र व सामाजिक कार्यकर्ते, संजय गांधी निराधार योजनेचे माजी अध्यक्ष माधवराव रामभाऊ हासे यांचे मंगळवारी आकस्मित निधन झाले. त्यांच्या निधनाने सर्व राजापूर व पंचक्रोशीतील ग्रामस्थांना मोठा धक्का बसला. माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांचे खंदे कार्यकर्ते असल्याने संपूर्ण अमृत उद्योग समूहातील कार्यकर्त्यांना देखील धक्का बसला. त्यांचे बंधू विनायकराव हे ऑस्ट्रेलियातून बुधवारी सकाळी पोहोचल्यानंतर राजापूर येथील हुतात्मा स्मारकाचे प्रांगणात माधवरावांचे पार्थिव अंत्यदर्शनासाठी ठेवण्यात आले. त्याप्रसंगी हजारो व्यक्ती दु:खीत अंतकरणाने जमले होते. माधवरावांचे राजापूर गावावर निस्सीम प्रेम होते आणि राजापूर ग्रामस्थांचेही माधवरावांवर अलोट प्रेम होते. याप्रसंगी त्यांचे जिवलग मित्र आणि एसटीतील सेवानिवृत्त अधिकारी बाबा गोसावी यांनी त्यांच्यावर झालेल्या घटनेचा वृत्तांत सांगितला आणि उपस्थित सर्वांनी हळहळ व्यक्त केली. त्याचबरोबर दैनिक युवावार्ता संस्थापक किसन भाऊ हासे यांनी माधवरावांच्या मागील पिढ्यांच्या सेवेचा इतिहास सांगून देवराम बाबा हासे यांचे सुपुत्र रामभाऊ हासे आणि रामभाऊ हासे यांचे सुपुत्र माधवराव यांनी राजापूर गावची निरपेक्ष सेवा केली. गरिबांना मदत केली. संजय गांधी निराधार योजनेच्या माध्यमातून त्यांनी हजारो गरीबांना शासकीय योजनांचा लाभ मिळवून दिला. त्यामुळेच विविध संस्था, पदाधिकारी, ग्रामस्थ आणि सामान्य नागरिक त्यांच्या अंत्यदर्शनासाठी सकाळपासून मोठया संख्येने उपस्थित राहिले होते.

राजापूर मधील तरुणांनी उस्फूर्तपणे त्यांची गावातून अंत्ययात्रा काढली आणि म्हाळुंगी तीरावर भैरवनाथ मंदिर प्रांगणात माधवरावांना अखेरचा निरोप देण्यात आला. याप्रसंगी माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांनी अमृत उद्योग समूहातील सेवाभावी नेतृत्व म्हणून माधवरावांच्या कार्याचा गौरव केला. कोणतीही अपेक्षा न ठेवता सामान्य लोकांना सहज सहकार्य करणारे व्यक्तिमत्त्व म्हणून ते सदैव स्मरणात राहतील असे नमूद केले. माधवराव हासे यांचे कार्य लक्षात घेऊन त्यांना पंचायत समिती सदस्य आणि संजय गांधी निराधार योजनेत अध्यक्ष अशी दोन तालुका स्तरावरील पदे देण्यात आली आणि त्याद्वारे त्यांनी तालुक्यातील जनतेची फार मोठी सेवा केली. अमृत उद्योग समूह परिवारातील कर्तबगार व्यक्तिमत्त्व म्हणून त्यांचे स्मरण सदैव राहील.



याप्रसंगी माजी आ. डॉ. सुधीर तांबे, माजी नगराध्यक्ष दुर्गाताई तांबे, धांदरफळ जिल्हा परिषद गटाचे माजी सदस्य व उद्योजक रामहरी कातोरे, आ. अमोल खताळ यांच्या पत्नी नीलम ताई खताळ, संगमनेरच्या नगराध्यक्ष डॉ. मैथिलीताई तांबे यांनी माधवरावांच्या स्मृती जागविल्या आणि त्यांना श्रद्धांजली व्यक्त केली. राजापूर गावातील सर्वात मोठी अंत्ययात्रा म्हणून इतिहासात नोंद होईल अशाप्रकारे राजापूरकरांनी आपल्या लाडक्या नेत्याला निरोप दिला. या प्रसंगी नूतन माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे माजी प्राचार्य जिजाबा हासे सर, प्रदीप हासे, माजी सरपंच संजय हासे, साखर कारखाना संचालक संतोष हासे, अ‍ॅड. बी. एन. गायकर, परशुराम हासे, देवराम भिमाजी हासे, भारत शेलकर, अ‍ॅड. अनिल गोडसे, ज्येष्ठ मार्गदर्शक आर. पी. नाना हासे यांच्यासह गावातील पदाधिकाऱ्यांनी, कार्यकर्त्यांनी अंत्यविधीच्या नियोजनासाठी विशेष प्रयत्न केले.

दैनिक युवावार्ता परिवाराच्यावतीने त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली.

# संगमनेरात मणक्याच्या विकारांवर विशेष तपासणी व उपचार शिबिर

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - एसआरव्ही हॉस्पिटल नाशिक यांच्या वतीने संगमनेर येथील नागरिकांसाठी मणक्याच्या विकारांवर विशेष तपासणी व उपचार शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. हे शिबिर शुक्रवार, दि. २७ मार्च २०२६ रोजी दुपारी १.३० ते ३.३० या वेळेत भोलाणे हॉस्पिटल येथे पार पडणार आहे.

या शिबिरात नाशिक येथील सुप्रसिद्ध मणके विकार तज्ञ डॉ. गौरव गुजराथी हे रुग्णांची तपासणी करून मार्गदर्शन करणार आहेत. रुग्णांना फक्त २०० रूपयामध्ये तज्ञ डॉक्टरांचा सल्ला मिळणार असून शिबिरासाठी नाव नोंदणीसाठी ९१३०६९०१५६ व ९६०७००५५४८ या क्रमांकांवर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.



या शिबिरात सततची पाठदुखी, स्लिप डिस्क, मानदुखी, सकाळी उठताना त्रास होणे, पायांना मुंग्या येणे, मणक्याचे फ्रॅक्चर तसेच औषधांनी बरी न होणारी पाठदुखी अशा विविध मणक्याच्या विकारांवर तपासणी व उपचार केले जाणार आहेत. विशेष म्हणजे, गरज भासल्यास दुर्बिणीद्वारे (मिनिमली इनवेसिव्ह) शस्त्रक्रियेची सुविधा उपलब्ध करून दिली जाणार आहे.

दुर्बिणीद्वारे शस्त्रक्रियेचे फायदे म्हणजे कमी वेदना, कमी रक्तस्त्राव, कमी दिवस रुग्णालयात राहावे लागणे, लहान जखम, लवकर चालणे व कामावर लवकर परतता येणे तसेच संसर्गाचा धोका कमी असणे हे आहेत.

या शिबिरात येताना रुग्णांनी आपले जुने वैद्यकीय अहवाल सोबत आणावेत असे आवाहन आयोजकांनी केले आहे. तसेच सर्व कॅशलेस व मेडिक्लेम सुविधा उपलब्ध असून, प्रधान मंत्री जन आरोग्य योजना अंतर्गत पात्र रुग्णांना मोफत उपचार व शस्त्रक्रियेची सुविधाही दिली जाणार आहे.

संगमनेर परिसरातील नागरिकांनी या शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.











# बोगस दिव्यांग, आणखी तीन शिक्षकांवर होणार कारवाई

युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर- जिल्हा परिषदेत बोगस दिव्यांग कर्मचाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढतच आहे. दोन आठवड्यापूर्वी १५ बोगस दिव्यांग कर्मचाऱ्यांवर निलंबनाची कारवाई केल्यानंतर आता पुन्हा तीन जणांचे दिव्यांग प्रमाणपत्र ४० टक्केपेक्षा कमी आढळले आहे. हे तिघेही शिक्षक असून त्यांचा खुलासा मागवल्यानंतर त्यांच्यावर पुढील कारवाई होणार आहे.

जिल्हा परिषद प्रशासनाने नाशिक या ठिकाणी जिल्ह्यातील ४१ दिव्यांग शिक्षकांची यादी तयार करून ते खरोखर दिव्यांग आहे की नाहीत, याची पडताळणी केली होती. या पडताळणीचा अहवाल जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांच्याकडे प्राप्त झाला असून यात ३ बोगस लुळे-पांगळे गुरूजी सापडले आहेत. राज्यभर दिव्यांग कर्मचारी तपासणीचे आदेश दिव्यांग मंत्रालयाचे सचिव तुकाराम मुंडे यांनी दिल्यानंतर अहिल्यानगर जिल्हा परिषदेने आपल्या दिव्यांग कर्मचार्यांची तपासणी अहिल्यानगर जिल्हा रूग्णालय व नाशिक येथील आरोग्य उपसंचालक कार्यालयाकडून करून घेतली.जिल्हा रूग्णालयाने १०६ दिव्यांग कर्मचार्यांची तपासणी दोन महिन्यांपूर्वी केली होती. त्याचा अहवाल आल्यानंतर त्यातील १८ जणांचे दिव्यांगत्व ४० टक्केपेक्षा कमी झाले होते. त्यातील १५ जणांवर सीईओंनी निलंबनाची कारवाई केली होती. एकाचा खुलासा मान्य करण्यात आला, तर दोघांच्या खुलाशावर फेरविचार होणार होता. दरम्यान, जिल्हा परिषदेने ४१ अल्पदृष्टी दिव्यांगांना तपासणीसाठी नाशिक आरोग्य उपसंचालक कार्यालयाकडे पाठवले होते. त्याचा अहवाल आता प्राप्त झाला असून त्यात तीन कर्मचारी बोगस आढळले आहेत. त्यात तिघांचे प्रमाणपत्र ४० टक्क्यांपेक्षा कमी आढळले आहे. हे तिघेही शिक्षक आहेत.